• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३४३ • शुक्रवार, दि. १५ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 343 • Friday 15 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

## संभाजीनगरची जागा ठाकरे गटाकडेच

संभाजीनगर - महाविकास आघाडीत जागावाटपाचा तिढा कायम असतानाच, छत्रपती संभाजीनगर लोकसभेची जागा आता ठाकरे गटाकडेच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याचं कारण म्हणजे लोकसभा निवडणूकीचं छत्रपती संभाजीनगरमधील ठाकरे गटाच्या प्रचार कार्यालयाचे उद्या उद्घाटन होणार आहे. उद्या सकाळी १० वाजता हा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. महाविकास आघाडीत अजूनही जागावाटपाचा निर्णय झाला नाही, मात्र ज्याप्रमाणे ठाकरे गटाकडून उद्यापासून प्रचार कार्यालयाचे काम सुरु केले जात आहे, त्यानुसार संभाजीनगरची जागा ठाकरे गटाकडे राहणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. ठाकरे गटाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, उद्या दिनांक १३ मार्च २०२४ वार बुधवार रोजी सकाळी १० वाजता शहरातील समर्थनगर येथे छत्रपती संभाजीनगर लोकसभा निवडणूक निमित्त शिवसेना प्रचार कार्यालयाचे स्तंभ पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर या प्रचार कार्यालयाचे काम सुरु होणार आहे. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी हा कार्यालय उभारला जाणार आहे, त्याच ठिकाणी दरवेळी माजी खासदार चंद्रकांत खैरे यांचे लोकसभा निवडणुकीचं प्रचार कार्यालय पाहायला मिळते. त्यामुळे उमेदवारी देखील खैरे यांना फायनल झाली असल्याची चर्चा आहे.

## शासकीय कार्यालयात पर्यवेक्षकाची हत्या

परभणी - हिंगोली जिल्ह्यातील आखाडा बाळापूर येथील बिज गुणन केंद्र कार्यालयात कार्यरत असलेल्या कृषी पर्यवेक्षकाचा धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली आहे. ही घटना गुरुवारी (दि. १४) दुपारी उघडकीस आली. घटनास्थळी आखाडा बाळापूर पोलिसांसह कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी दाखल झाले होते. राजेश शिवाजी कोल्हाळ (रा. कोंडवाडा, ता. सेनगाव) असे मयताचे नांव असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आखाडा बाळापूर शहरालगत बिज गुणन केंद्र आहे. या ठिकाणी राजेश कोल्हाळ हे पर्यवेक्षक म्हणून काम करतात. कोल्हाळ हे नेहमीप्रमाणे कामकाजासाठी आले होते. गुणन केंद्राच्या परिसरात असलेल्या कृषी विभागाच्या शेतातच मशागतीचे काम सुरु होते तर काही मजूर देखील कामावर होते. दरम्यान, आज दुपारी कोल्हाळ हे कार्यालयात काम करीत बसले होते. त्यानंतर दुपारी एक वाजण्याच्या सुमारास कर्मचारी त्यांच्या कार्यालयात गेल्यानंतर कोल्हाळ हे रक्तबंबाळ अवस्थेत असल्याचे दिसून आले.

## महानंदच्या पुनरुज्जीवनासाठी कोटींचा निधी

मुंबई - महानंद या सहकारी दूध क्षेत्रातील शिखर संस्थेच्या बळकटीकरणासाठी संस्थेचे व्यवस्थापन पुढील पाच वर्षांसाठी राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाकडे (एनडीडीबी) सोपविण्यास राज्य मंत्रिमंडळाने आज (१३ मार्च) मान्यता दिली. यासाठी सरकारकडून महानंदाला २५३ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. महानंद हा ब्रॅण्ड महाराष्ट्रातील शेतकरी आणि ग्राहकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे या संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. महानंदच्या पुनर्वसन योजनेसाठी सरकार आणि एनडीडीबी यांच्यात आवश्यक तो करारनामा करण्यात येणार आहे. महानंदच्या व्यावसायिक विकासासाठी पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास सचिव यांच्या अध्यक्षतेखालील 'सुकाणू समिती'मार्फत निर्णय घेण्यात येणार आहे. महानंदाच्या पुनरुज्जीवन योजनेसाठी २५३ कोटी ५७ लाख इतका निधी भागभांडवल स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येईल. यापैकी २४८ कोटी रुपये २०२४-२५ या आर्थिक वर्षात दिले जाणार आहे. महानंदला व्यावसायिक दृष्टिकोन आणि सहकारी तत्त्वांच्या अवलंब करून पुनरुज्जीवन तसेच सक्षमीकरण करावे यासाठीची जबाबदारी एनडीडीबीवर सोपविण्यात आली आहे. एनडीडीबीने सादर केलेल्या प्रकल्प अहवालानुसार पुढील ५ वर्षांत महानंद ८४ कोटी इतक्या नफ्यात येईल. महानंदचा पुनर्वसन करताना एनडीडीबीने सहकारी संस्थांची त्रिस्तरीय संरचना राहील, यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी गावपातळीवर एक गाव, एक दूधसंस्था राहील. दूधउत्पादक शेतकरी हे संघाचे सदस्य राहतील. महानंदाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीसाठी लागणाऱ्या निधीव्यतिरीक्त उर्वरीत घटकांसाठी लागणारा निधी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय सचिव यांच्या मान्यतेने उपलब्ध करण्यात येणार आहे.

# केंद्र सरकार नागरिकांवर हुकूमशाही लादणार -ठाकरे



**मुंबई । वृत्तसेवा**

कोकणाचा आशीर्वाद घेऊनच मी महाराष्ट्र फिरतोय. शिवसेना आणि कोकण हे नाते घट्ट आहे. मी माझ्या महाराष्ट्रासाठी काम करत होतो, म्हणून 'भाडोत्री जनता पक्षा'ने आपले सरकार गद्दारी करून पाडले. भाजपच्या हिंदुत्वामध्ये शिव्या आहेत, आमच्या हिंदुत्वामध्ये ओव्या आहेत. आता म्हणतात की, विकसनशील भारतासाठी पुन्हा एकदा मोदी सरकार! मग १० वर्ष काय करत होतात, असा थेट सवाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी केला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे राज्यातील ठिकठिकाणी दौऱ्यावर आहेत. कोकण भेटीत गुहागर येथे जनसंवाद सभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. भाजपचा ४०० पारचा डाव फक्त देशाची घटना बदलण्यासाठी आहे. घटना बदलून ते आपल्यावर हुकूमशाही लादणार आहेत. अधिकाऱ्यांना सांगतो, माझ्या शिवसैनिकांना विनाकारण त्रास द्याल, तर आमचे सरकार आल्यावर कायद्याचे फटके काय असतात हे तुम्हाला दाखवेन, असा स्पष्ट इशारा उद्धव ठाकरेंनी यावेळी बोलताना दिला. मला मुख्यमंत्री व्हायचे नव्हते. पण मला ते पद स्वीकारावे लागले. ज्यांनी तुम्हाला मोठे केले, तुमच्या मुलाबाळांची काळजी वाहिली, एखादे पद स्वीकारले तर काय झाले. शिवसेना ही चार अक्षरे त्यांच्या पाठी लागली नसती.



बीड - भाजपाकडून बीड लोकसभा मतदार संघाची उमेदवारी माजी मंत्री पंकजा मुंडे यांना जाहिर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना खा.प्रितम मुंडे, भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के.



बीड - बीड विधानसभेचे लोकप्रिय आ.संदीप क्षीरसागर यांनी शहरातील व्यावसायिकांची बैठक घेऊन त्यांच्याशी विविध मुद्यांवर संवाद साधला. यावेळी बाजार समितीचे सभापती व संचालकही उपस्थित होते.

# हमीभावाच्या शासकीय खरेदीकडे शेतकऱ्यांनी फिरवली पाठ

**मुंबई । वृत्तसेवा**

गेल्या खरीप हंगामात गोंदिया जिल्ह्यात धानाच्या उत्पादनात वाढ झाली. कृषी विभागाच्या अंदाजानुसार हेक्टरी ४० क्विंटल धानाचे उत्पादन झाले. त्यामुळे खरीप हंगामात शासकीय धान खरेदी केंद्रावर ४० लाख क्विंटल धान खरेदी होण्याचा अंदाज वर्तविला जात होता, तर मागील वर्षीसुद्धा खरिपात ४० लाख क्विंटल धान खरेदी झाली होती; पण यंदा खरीप हंगामात जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या धान खरेदी केंद्रावर केवळ २४ लाख ७५ हजार क्विंटल धान खरेदी झाली असून मागील वर्षीच्या तुलनेत यात १५ लाख क्विंटलने घट झाली आहे.

शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळांतर्गत शासकीय धान खरेदी केंद्रावरून हमीभावाने धान खरेदी करते. जिल्हा मार्केटिंग फेडरेशन खरीप हंगामात एकूण १८३ केंद्रावरून ८० हजार ७४० शेतकऱ्यांकडून २४ लाख ७५ हजार ५९५ क्विंटल धान



खरेदी केली आहे. खरेदी केलेल्या एकूण धानाची किमत ५४० कोटी रुपये असून यापैकी ५१३ कोटी रुपयांचे चुकारे शेतकऱ्यांना अदा केले असून १७ कोटी रुपयांचे चुकारे ३१८१ शेतकऱ्यांना करणे बाकी आहे. विशेष शासनाने धान खरेदीला दोनदा मुदतवाढ दिली; पण यानंतरही धान खरेदीच्या आकड्यात वाढ होत नसल्याचे चित्र आहे. तर मागील वर्षीच्या तुलनेत धान खरेदीत १५ लाख क्विंटलने घट झाल्याने मोठ्या प्रमाणात धान शेतकऱ्यांनी बाहेर विक्री केल्याचे बोलल्या जाते. खरीप हंगामात तब्बल दोन महिने उशिरा धान खरेदी केंद्र सुरू झाल्याने याचा परिणामसुद्धा धान खरेदीवर झाल्याचे बोलल्या जाते. शासनाने धानाला प्रति हेक्टर २० हजार रुपये बोनस दोन हेक्टरपर्यंत देण्याची घोषणा केली. याचा लाभ केवळ शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांनाच दिला जाणार असल्याचे शासनाने आधीच स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील १ लाख २५ हजार १२९ शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली असून एवढ्याच शेतकयांना शासनाच्या बोनसचा लाभ मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेल्या धानाची भरडाईसाठी अद्यापही उचल करण्यात आली नाही. राइस मिलर्सने करारनाम्याला घेऊन धान खरेदीवर मागील चार महिन्यां- पासून बहिष्कार टाकला आहे; पण शासनाने यावर अद्यापही तोडगा काढला नाही. परिणामी, जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने खरेदी केलेल्या २४ लाख ७५ हजार क्विटल धान तसाच केंद्रावर उघड्यावर पडला आहे.

## वन नेशन, वन इलेक्शन समितीचा अहवाल सादर

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

भारताच्या स्वातंत्र्याच्या पहिल्या दोन दशकांनंतर एकाचवेळी निवडणुका घेतल्या नाहीत. त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर, राजकारणावर आणि समाजावर घातक परिणाम झाला. सुरुवातीला दर दहा वर्षांनी दोन निवडणुका होत होत्या. आता दरवर्षी अनेक निवडणुका होत आहेत. यामुळे सरकार, उद्योगधंदे, कामगार, न्यायालये, राजकीय पक्ष, निवडणूक लढवणारे उमेदवार आणि नागरिकांवर मोठा भार पडत आहे. त्यामुळे सरकारने एकाचवेळी निवडणुकांचे चक्र पूर्ववत करण्यासाठी कायदेशीर यंत्रणा विकसित करावी, अशी शिफारसही समितीने केली आहे. देशाचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वाखाली 'वन नेशन, वन इलेक्शन' या विषयासाठी समिती नेमण्यात आली होती. यामध्ये देशाचे गृहमंत्री अमित शहा यांचाही समावेश आहे. या समितीने आपला १८६२६ पानी अहवाल भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सादर केला आहे. हा अहवाल तयार करण्यासाठी समितीला सुमारे सात महिने लागले. रामनाथ कोविंद यांच्या समितीने देशात पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुक एकाच वेळी तर दुसऱ्या टप्प्यात या दोन निवडणुकांसोबत नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुकाही घेण्यात याव्यात अशी महत्वाची शिफारस केली आहे.

# आदित्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना कॅम्पस मुलाखतीद्वारे मिळाली नोकरी

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना करिअरच्या संपूर्ण संधी उपलब्ध करून दिल्या जातात. विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या विविध गुणांना वाव मिळून देऊन त्यांच्यातील नेतृत्व गुणाला संधी दिली जाते. नुकत्याच आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात झालेल्या कॅम्पस मुलाखतीद्वारे ११ विद्यार्थ्यांना ट्रॅक्टर कंपनीमध्ये नोकरीची संधी मिळाली. स्पर्धेच्या काळात इतक्या मोठ्या प्रमाणात कॅम्पस इंटरव्ह्यू मध्ये संधी मिळणारे हे जिल्ह्यातील महाविद्यालय ठरले आहे. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक मा. सुभाषचंद्रजी सारडा यांनी ठरवून दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे तसेच आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका तथा वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी कार्यकारिणी सदस्या डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली.



महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांच्या उपस्थितीत आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात तडढळश्रश्रशी ढीरर्ली या कंपनीचे कॅम्पस इंटरव्ह्यू चे आयोजन करण्यात आलेले होते. यामध्ये इंटरव्ह्यूकरिता कंपनीच्या वतीने सुरेश पवार उपस्थित होते. विद्यार्थ्यांची निवड या पदाकरीता करण्यात आली. विद्यार्थ्यांना ३ लाखांचे पॅकेज कंपनीने देऊ केले आहे. तसेच कंपनीसाठी असेच गुणवंत विद्यार्थी येत्या काळातदेखील आपल्या महाविद्यालयाकडून मिळावेत अशी अपेक्षादेखील यांनी व्यक्त केली. कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवडीची संख्या वाढण्याचे कारण म्हणजे संस्थेच्या संचालिका डॉ.आदितीजी सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांनी घेतलेले विविध प्रशिक्षण कार्यक्रम, विद्यार्थ्यांना मुलाखतीचे तंत्र अवगत करण्यासाठी दिलेले प्रशिक्षण, गट चर्चा, प्टिट्यूड टेस्ट, मॉक इंटरव्ह्यू, टेक्निकल आणि नॉलेज स्पर्धा आदिमधून विद्यार्थ्यांचे सॉफ्ट स्किल विकसित केले गेले. त्यामुळे आदित्य शिक्षण संस्थेचा विद्यार्थी देशात कुठेही मागे राहत नाही.

संपादकीय

## कोण संसारी, कोण संत?

दर गुरुवारी मठात जायचं. श्री दत्तात्रयांचं दर्शन घ्यायचं. थोडा वेळ तिथं बसायचं. थोडसं नामस्मरण करायचं त्या बरोबर तिथल्या सुविचार फलकावरचा रोजचा नवा सुविचार वाचायचा. त्या फलकावर एक विचार वाचला त्यात असे म्हटले होते की 'घर सांभाळतो तो संसारी आणि मन सांभाळतो तो संत.' संत आणि संसारी कोण? याची ते अगदी थोडक्या शब्दांत केलेली व्याख्या होती. पण जेव्हा माझा मीच त्या व्याख्येवर विचार करायला लागलो. तेव्हा हळूहळू लक्षात यायला लागले की ही व्याख्या साधी सोपी आणि लहान नाही तर ती महान आहे. कारण तसं तर आपल्यात आणि संतांच्यात बघायला गेलं तर विशेष असा काय बदल असतो! उलट आपल्याकडचे काही संत हे तर आपल्या सारखेच संसारी, प्रापंचिक होते आणि आहेतही. मग असं असताना त्यांच्यात आणि संसारी व्यक्तीत नेमका फरक तो काय आणि कोणता असतो? या गोष्टीवर मी विचार करत गेलो तेव्हा असं लक्षात आलं की संसारी काय किंवा संत काय हे वरकरणी जरी एकमेकांसारखेच दिसत असले तरी त्यात मोठा फरक आहे. तो म्हणजे दोघांच्याही मानसिकतेचा. जो मनुष्य संसारी आहे तो आपलं घरदार, मुलबाळ, बायको, प्रपंच याचा विचार करत असतो. इथला घरदार हा शब्द दोन अर्थांचा आहे. एक म्हणजे माणसाचं राहतं घर आणि दुसरं म्हणजे त्याचा देह. दोन्ही गोष्टी मातीच्याच पण त्यात तो पार अडकलेला असतो. यांचा भार त्याने आपल्या खांद्यावर घेतलेला असतो. तर संतांनी त्या दोन्ही गोष्टींचा भार हा आपल्या खांद्यावर न घेता तो देवाच्या पायावर घातलेला असतो. म्हणून संसारी हा त्या भाराखाली असतो. तर संत हे भारमुक्त असतात. ते सर्व सामान्य जीवासारखी संसार प्रपंच्याची चिंता करत नाहीत, तर ते ईश्वराचे चिंतन करतात. जो जीव आसक्त असतो तो संसारी आणि जो अनासक्त असतो तो संत. संताकडे देहाच्या पावित्र्यापेक्षा मनाच्या शुद्धतेला अधिक महत्त्व असते. जीवनातली सुखदु:ख ही तर मग तो जीव संसारी असो वा संत प्रत्येकाला ती भोगावी लागतातच. पण संसारी ती परत परत उगाळत बसतो, तर संत त्याचा फिरून विचारही करत नाहीत. त्यामुळेच संत संसारात असूनही सुखी आणि समाधानी असतात.

# प्रितम मुंडेंना विस्थापित करणार नाही -पंकजा मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

नेत्या पंकजा मुंडे यांना भाजपकडून बीड लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झालीय. पण या मतदारसंघात सध्या पंकजा यांच्या बहीण प्रीतम मुंडे या खासदार आहेत. पक्षाने प्रीतम मुंडे यांचं तिकीट कापून पंकजा यांना उमेदवारी दिली आहे. भाजपकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पंकजा मुंडे आणि प्रीतम मुंडे यांनी एकत्रित पत्रकार परिषद घेतली. यावेळी पंकजा यांनी आपल्या बहीणीचं तिकीट कापून आपल्याला उमेदवारी मिळाली असली तरी प्रीतम ताईला आपण विस्थापित करणार नाही, असं मोठं वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केलं आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांचं आगामी काळात राज्यसभा निवडणूक, विधानसभा किंवा विधान परिषदेच्या निवडणुकीत राजकीय पुनर्वसन होतं का? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. माझी उमेदवारी जाहीर झाली ही गोष्ट माझ्यासाठी नक्कीच सन्मानजनक आहे. त्यामुळे माझ्या भावना आभाराच्या आहेत. थोडीसी संमिश्र भावना नक्कीच आहेत. कारण प्रीतम मुंडे या गेल्या १० वर्षांपासून खासदार होत्या. त्या खासदार असताना मी राज्याचं राजकारण करत असताना आता एकदम केंद्राच्या राजकारणात जात असताना थोडीसी धाकधूक नक्कीच वाटतेय. पण नवीन अनुभव आहे, अशी प्रतिक्रिया पंकजा मुंडे यांनी दिली. आपल्याला उमेदवारी मिळेल, याची अपेक्षा होती का? असा प्रश्न पंकजा यांना विचारण्यात आला. अपेक्षा होती. कारण याबाबत गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरु होत्या. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर फार मोठा धक्का लागला असं नाही. कारण बऱ्याचदिवसांपासून तशा चर्चा सुरु होत्या. पण साहजिकच आहे, जोपर्यंत पक्षाकडून अधिकृतपणे सहीसोबत उमेदवारी जाहीर होत नाही तोपर्यंत ती उमेदवारी अधिकृत नसते.



त्यामुळे मला फार त्याबाबत आत्मविश्वास नव्हता, असं पकंजा मुंडे यांनी सांगितलं. प्रीतम मुंडे या वडील गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर त्यांचं एवढं छान डॉक्टरचं करिअर सोडून राजकारणात आल्या. त्यांनी दहा वर्ष संपूर्णपणे स्वत:ला राजकारणात वाहून घेतलं. आमच्या दोघींचं समन्वय फार छान होतं. मी राज्य सांभाळायची ते जिल्हा सांभाळायच्या. मी ज्या गोष्टी वेळेअभावी करु शकत नव्हती त्या गोष्टी प्रीतम ताई करत होत्या. मी धोरणात्मक गोष्टी करायची तर व्यक्तीगत गोष्टी त्या करायच्या. त्यामुळे आमच्या दोघींमध्ये तो समव्य चांगला होता आणि ते भविष्यातही राहणार आहे. प्रीतम ताई खासदार असताना मी पाच वर्ष घरी बसले. आम्हाला तोही अनुभव आहे. आता मला असं वाटतं तेवढा वेळ प्रीतम ताईंना वाट बघावी लागणार नाही. मी जे शब्द जाहीररित्या सांगितले की, मी प्रीतम मुंडे यांना विस्थापित करणार नाही. त्या शब्दावर मी कायम आहे, असं पंकजा मुंडे म्हणाल्या. पंकजा यांच्या या वक्तव्यानंतर प्रीतम ताईंना राज्यसभेची उमेदवारी मिळेल का? असा प्रश्न विचारण्यात आला. आता याबद्दल मी भाष्य करणं बरोबर नाही. गेल्या ५ वर्षात १० विधान परिषद आणि १० राज्यसभा निवडणुका झाल्या असतील. त्या अनेकवेळा माझं नाव चर्चेत आलं होतं. त्या प्रत्येकवेळेला मी सांगितलं होतं की, ते माझ्या हातात नाही. माझा निर्णय नाही. त्यामुळे त्याबाबत आता भाष्य करणं अनुकूल नाही, अशी प्रतिक्रिया प्रीतम मुंडे यांनी दिली. राजकीय वनवास संपला असं म्हणता येईल का? असा प्रश्न पंकजा मुंडे यांना विचारण्यात आला. त्यावर पंकजा यांनी राजकारण हा एक फार मोठा खडतर प्रवास आहे. तो कायम असतो. पदावर असल्याने तो प्रवास कमी होतो असं नाही. पण नक्की आता बीड जिल्ह्याची जनता काय करेल याकडे महाराष्ट्राची जनता लक्ष ठेवून आहे. हा प्रवास कसा होतो याबाबत मलाही उत्सुकता आहे. कारण प्रीतम ताईंच्या लोकसभेच्या निवडणुकीत आम्ही प्रचंड संघर्ष केला होता. त्यामुळे या निवडणुकीतही काय परिस्थिती निर्माण होते. निवडणुका दुसऱ्यांसाठी लढणं हा वेगळा अनुभव राहीला आहे. आता स्वत:साठी उमेदवारी मिळाल्यानंतर वेगळ्या पद्धतीने विचार करावा लागेल, अशी प्रतिक्रिया दिली. धनंजय मुंडे हे जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्यांचा पक्ष आणि आमचा पक्ष यांची राज्यात युती आहे. त्यामुळे नैसर्गिकरित्या आम्ही जिल्ह्यात एक आहोत. आमच्या युतीनंतर जेवढ्या मतांनी प्रीतम ताई निवडून आल्या होत्या त्यापेक्षा अधिक मतांनी निवडून येण्यासाठी त्यांचं योगदान नक्कीत मिळेल, असा विश्वास पंकजा मुंडे यांनी व्यक्त केल्या.

# विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीसाठी कोटींचा निधी

**पुणे । वृत्तसेवा**

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या अंतर्गत शुल्क प्रतिपूर्तीसाठी ६१ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर संबंधित वर्गातील विद्यार्थी संख्येच्या कमीत कमी २५ टक्के जागा वंचित व दुर्बल घटकांतील मुलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे. सन २०२३- २०२४ या आर्थिक वर्षात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रतिपूर्तीसाठी २०० कोटी एवढ्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. त्यातील १३८ कोटी ७५ लाखांचा निधी यापूर्वीच वितरित करण्यात करण्यात आलेला आहे. त्यानंतर आता उर्वरित निधी देण्यात आला. प्राथमिक शिक्षण संचालकांना जिल्ह्यांनी केलेल्या मागणीच्या प्रमाणात निधी वितरीत करावा लागणार आहे. वितरीत करण्यात आलेल्या निधीचा उपयोग केवळ सन २०२३-



२४ या वर्षामधील शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी करावा लागणार असून, यापूर्वीच्या प्रलंबित शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याकरिता वेगळा निधी वितरित करण्यात येणार आहे. ज्या शाळांनी कमीत कमी २५ टक्के जागांवर वंचित व दुर्बल घटकांतील बालकांना प्रवेश दिले आहेत, अशा शाळांनी इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्काचा तपशील सरल या पोर्टलवर अथवा आरटीई पोर्टलवर जाहीर करावा लागणार आहे. ज्या शाळांचे स्वत:चे संकेतस्थळ आहे, अशा शाळांनी शुल्काचा तपशील संकेतस्थळावर जाहीर करावा लागणार आहे. शाळेला आरटीईची मान्यताप्राप्त असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडावे लागणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन लॉटरी पद्धतीने यापूर्वी ज्या शाळेत प्रवेश मिळालेला आहे, असे विद्यार्थी संबंधित शाळेतच शिकत असल्याची खात्री सरल व आरटीई पोर्टलवरून द्यावी लागणार आहे. सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड सरल पोर्टलवर नोंदविलेले असावे. केवळ आधार नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या ग्राह्य धरावी लागणार आहे.

### जाहिर प्रगटन

मा.श्रीमती एस.एन. निकम, दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २८३/२०२४
मनिषा व इतर विरूध्द निरंक

अर्जदार - १) मनिषा भ्र. हनुमान मुळीक, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, २) ईश्वरी पि. हनुमान मुळीक, वय ४ वर्षे, अज्ञान, अ.पा.क. आई, अर्जदार क्र. १, ३) रंजना भ्र. नाना मुळीक, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, ४) नाना पि. लक्ष्मण मुळीक, वय ६५ वर्षे, धंदा निरंक, अर्जदार क्र. १ ते ४ रा. शिखरवाडी, ता. पाटोदा, जि.बीड.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांनी या न्यायालयात मयत हनुमान पि. नाना मुळीक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी हनुमान पि. नाना मुळीक यांचा मृत्यू दिनांक ३१/०७/२०२३ रोजी सणसवाडी, ता. शिरूर, जि. पुणे येथे झाला असून अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी आहे आणि अर्जदार क्र. ३ व ४ हे मयताचे आई-वडील आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरिता व इतर कार्यालयीन उपयोगाकरिता वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत हनुमान पि. नाना मुळीक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १४ मार्च २०२४

आज दिनांक ३१ माहे जानेवारी २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

क.लिपीक

कोर्टाचा शिक्का

मार्फत अॅड. काकडे ई.जी.

आदेशावरून स्वाक्षरीत/- सहा.अधिक्षक दिवाणी न्यायालय, क.स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि.बीड

### जाहिर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाटोदा यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ७६/२०२४
मैनाबाई वि.निरंक

ज्यापेक्षा ज्ञानोबा पि. मारूतीराव सवासे, रा. मौजे नफरवाडी, ता. पाटोदा, जि. बीड हे दिनांक ०७/०२/२०२२ रोजी मयत झालेले असून खालील अर्जदार त्यांचे वारस आहेत. १) मैनाबाई भ्र. ज्ञानोबा सवासे, पत्ता नफरवाडी, ता.पाटोदा, जि. बीड, ह.मु. जातेगाव, ता.जामखेड, जि. अहमदनगर, २) अविनाश पि. ज्ञानोबा सवासे, नफरवाडी, ता. पाटोदा,जि.बीड, ह.मु. हनुमान मंदिरजवळ, आनंदनगर, धानोरा रोड, ता.बीड, जि.बीड, ३) रामहरी पि. ज्ञानोबा सवासे, नफरवाडी, ता.पाटोदा,जि.बीड, ४) सुनिता भ्र. प्रकाश गायकवाड, पाटील गल्ली, जातेगाव, ता.जामखेड, जि. अहमदनगर. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहित मुलगी आहे. या व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहू मयत ज्ञानोबा पि. मारूतीराव सवासे,यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

पु.ता. २६/०४/२०२४

आज दिनांक : ११/०३/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, पाटोदा

कोर्टाचा शिक्का

मार्फत अॅड. बारगजे एन.ए.

आदेशावरून स्वाक्षरीत/- सहा.अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,पाटोदा

### नावात बदल

मी माझ्या नावात केलेला बदल खालीलप्रमाणे आहे.
जुने नाव - मालीनी गोरख शिराळे
नवीन नाव - मालन गोरख शिराळे
कायमचा पत्ता - बार्शी रोड, जिजाऊ नगर,बीड बीड -४३११२२, मो. ९७६७००८४००

### जाहिर प्रगटन

मा. श्रीमती एस. एस. पिंगळे दिवाणी न्यायाधीश.व स्तर बीड यांच्या न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २४३/२०२४
नंदुबाई मुंडे वि.निरंक

अर्जदार - १) नंदुबाई भ्र. नारायण मुंडे, वय ५९ धंदा घरकाम, रा. दत्तनगर आदर्शगणेशनगर, बीड,ता.जि.बीड, २) मिनाक्षी भ्र. बाबासाहेब चाटे, वय ५०, धंदा घरकाम, रा. बालाघाट कॉलनी कॅनॉल रोड, बीड, ता.जि.बीड, ह.मु. बंकटस्वामी नगर बीड, ता.जि.बीड.

विरूध्द निरंक

प्रकरण - भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी असराबाई चाटे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत असराबाई चाटे हे दिनांक १२/१२/२०२३ रोजी राहते घरी दत्तनगर आदर्श गणेशनगर, बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची मुलगी असून अर्जदार क्र.२ ही मयताची सुन आहे. मयताचे पती नामे अप्पाराव चाटे हे दिनांक १०/१०/९३ रोजी मयत झाले असून मयताचा मुलगा नामे बाबासाहेब चाटे हे दिनांक २३/०७/९४ रोजी मयत झालेले आहेत. वरील अर्जदाराशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत तसेच त्यांच्या स्थावर व जंगम मिळकतीसंबंधी मृत्यूपत्र बनवलेले नाही अथवा कोणालाही नामनिर्देशीत केलेले नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे . त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार क्र. १ व ३ हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी . जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याने वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख १३/०३/२०२४

आज दिनांक ०६/०२/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

मार्फत्र अॅड.जी.एस.घुगे

आदेशावरून. स्वाक्षरीत/- अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.

# जायकवाडी धरण प्रकल्पग्रस्तांना दिलासा




**जालना । वृत्तसेवा**

राज्यातील प्रमुख धरण असलेले जायकवाडी धरण आणि नगर जिल्ह्यातील मुळा धरण या दोन्ही धरणांच्या प्रकल्पग्रस्तांना मोठा दिलासा मिळणार आहे. दोन्ही प्रकल्पातील शेतकऱ्यांचे मोबदला जमीन मागणीबाबतचे प्रस्ताव पाठवण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी. असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री यांनी दिले आहेत. मंत्रालयात या दोन्ही धरणांच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. जायकवाडी व मुळा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने प्रकल्पग्रस्त म्हणून मिळालेल्या मोबदला रक्कमेद्वारे जमीन मिळावी. ही मागणी लक्षात घेऊन मंत्रालयात ही बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ प्रतिनिधी व अहमदनगरचे जिल्हाधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. तर राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील व आमदार मोनिका राजळे हे मंत्रालयात उपस्थित होते. प्रकल्पग्रस्तांच्या बाबतचे विविध प्रश्न विचारात घेण्यात आले आहेत. काही ठिकाणी प्रकल्पग्रस्तांसाठी देण्यात आलेल्या जागांवर अतिक्रमण देखील झालेले आहे. तर वन विभागाच्या जमिनीवर पुनर्वसन करण्यात आले आहे. यातील काही प्रकरणातील अधिकार केंद्र सरकारकडे आहेत. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांमुळे निकषांमध्ये बदल झाले आहेत. या मागण्यांच्या पूर्ततांसाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्यात येतील. १९७६ नंतर प्रकल्पग्रस्तांना मोबदला जमीन देण्याबाबत कायदे झाले आहेत. पूर्वीच्या प्रकरणांमध्ये विधी व न्याय विभागाचा अभिप्राय घेण्यात येईल. असेही मंत्री यांनी यावेळी म्हटले आहे. यावेळी अहमदनगर जिल्ह्याबरोबरच विविध जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांच्या अडचणी सोडविता याव्यात. यासाठी सर्व जिल्ह्यातील अशी प्रकरणे राज्य सरकारकडे मागवून घ्यावीत. तसेच राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अधिकारातील विषय सोडविण्यासाठी प्राधिकरणाचे अध्यक्ष, उपमुख्यमंत्री व संबंधित मंत्री यांच्याकडे सादर करण्यात येतील व निर्णय घेऊन प्राधिकरणासमोरील विषय सोडविण्यात येतील.

# नागपूर होणार देशाचे लॉजिस्टिक कॅपिटल -केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**नागपूर । वृत्तसेवा**

सिंदी रेल्वे हा भौगोलिकदृष्ट्या वर्धा जिल्ह्याचा भाग असला तरी त्याला नागपूरपेक्षा वेगळे मानत नाही. त्यामुळे नागपूरमधील उद्योगांना सिंदी ड्राय पोर्टशी जोडून मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे. येत्या काळात नागपूर हे देशाचे 'लॉजिस्टिक कॅपिटल' म्हणून नावारुपाला आलेले असेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज व्यक्त केला. सिंदी रेल्वे येथे बहुप्रतीक्षित अशा मल्टिमोडल लॉजिस्टिक पार्कचे नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी सिंदी रेल्वे टर्मिनल सेवेच्या चाचणीलाही त्यांनी हिरवी झेंडी दाखवली. महत्त्वाचे म्हणजे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असा हा प्रकल्प आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या अधिपत्याखालील भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि नॅशनल हायवेज लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट लिमिटेड (एनएचएलएमएल) यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी खासदार रामदास तडस, आमदार पंकज भोयर, आमदार समीर कुणावार, आमदार दादाराव केचे, माजी खासदार सुरेश वाघमारे, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे (जेएनपीटी) अध्यक्ष उन्मेष वाघ, एनएचएलएमएलचे संचालक के. सत्यनाथन आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. गडकरी यांनी सिंदी येथील ड्रायपोर्टचा शेतकऱ्यांना लाभ होणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले, 'आज विदर्भाच्या शेतातील उत्पादन किंवा याठिकाणी तयार होणाऱ्या वस्तुंची बांगलादेशमध्ये निर्यात करायची असेल तर रेल्वेने मुंबईला पाठवून तेथून समुद्रामार्गे श्रीलंका व श्रीलंकेतून बांगलादेशला पाठवावे लागते. आता या लॉजिस्टिक पार्कमधून रेल्वेमार्गे थेट हल्दिया



(प.बंगाल) आणि तेथून बांगलादेशला आपला माल निर्यात करता येणार आहे. नागपूरचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग देखील येथून जवळ आहे. ड्राय पोर्टमुळे लॉजिस्टिक कॉस्ट कमी होईल. परिणामी शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळेल आणि त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही.' निर्यात करणाऱ्या उद्योगांचे क्लस्टर याठिकाणी तयार होणार असल्याचेही गडकरी म्हणाले. ड्रायपोर्टसाठी एक सल्लागार मंडळ नेमण्याच्या सूचनाही मंत्री महोदयांनी दिल्या. यामध्ये प्रकल्पातील तज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील व्यक्ती व लोकप्रतिनिधींचा समावेश करण्यासही त्यांनी सांगितले. खासदार रामदास तडस म्हणाले की, '२०१४ पूर्वी वर्धेमध्ये केवळ १६० किलोमीटर लांबीचे रस्ते होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अवघ्या दहा वर्षांत संपूर्ण चित्र पालटले आणि आता ५६० किलोमीटरने रस्त्यांची लांबी वाढली आहे.' सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी केले. लॉजिस्टिक पार्कमध्ये विदर्भातील उद्योजकांनी जास्तीत जास्त गुंतवणूक करावी, अशी अपेक्षा गडकरी यांनी व्यक्त केली. 'बाहेरचे उद्योग याठिकाणी येणारच आहेत. पण विदर्भातील मोठ्या उद्योजकांनीही गुंतवणूक करावी. विशेषतः वर्धा जिल्ह्यातील उद्योजकांनी पुढे येण्याची गरज आहे. याठिकाणी शेतीवर आधारित उद्योगांचाही विस्तार करता येईल. जेणेकरून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. त्यात स्थानिकांना रोजगार देण्यास प्राधान्य असेल,' असेही नितीन गडकरी म्हणाले. नागपूर ते वर्धा या रेल्वे मार्गावर चौथ्या लाईनचे काम सुरू झाल्यामुळे तसेच नागपूर ते वर्धा ब्रॉडगेज मेट्रोचा करार झाल्यामुळे नागपूर-वर्धा अंतर केवळ ३५ मिनिटांत कापणे शक्य होईल, असे नितीन गडकरी यांनी सांगितले. यावेळी सिंदी ते सेलडोह या रस्त्याच्या सिमेंट काँक्रिटीकरण आणि चौपदरीकरणासाठी १०६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलू असून लवकरच या रस्त्याचे काम सुरू होईल, असेही गडकरी म्हणाले.

# १० वीच्या परीक्षा संपल्या



**नागपूर । वृत्तसेवा**

फेब्रुवारी-मार्च महिना म्हटलं की दहावी-बारावीच्या अंतिम बोर्डाच्या परीक्षा सुरू होतात. आज (१४ मार्च) रोजी सीबीएसई बोर्डाच्या दहावीच्या परीक्षा संपल्या असून आता वेध लागतील ते म्हणजे परीक्षांच्या निकालांचे. तेव्हा विद्यार्थी आणि पालकांना उत्सुकता आहे की सीबीएसई बोर्डाच्या परीक्षांचा निकाल कधी येणे अपेक्षित आहे? परीक्षा संपल्या असून आता उत्तरपत्रिका तपासण्याचे काम सुरू झाले आहे. अद्याप बोर्डानं परीक्षांच्या निकालांची तारीख जाहीर केली नाही परंतु लवकरच ही तारीख जाहीर करण्यात येईल. समोर आलेल्या माहितीनुसार, मे महिन्यात हा निकाल लागू शकतो. परंतु अद्याप याबद्दल कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. गेल्यावर्षी सीबीएसई बोर्डाने दहावीची परीक्षा ही १४ फेब्रुवारी ते २१ मार्चपर्यंत ठेवली होती आणि त्यानंतर १२ मे रोजी परीक्षेचा निकाल जाहीर केला होता. २०२२ मध्ये सीबीएसईच्या दहावीच्या बोर्डाची परीक्षा ही दोन टर्ममध्ये घेतली होती. पहिली टर्म ही नोव्हेंबर-डिसेंबर तर दुसरी टर्म मे-जून अशी ठेवली होती आणि या परीक्षेचा निकाल हा २२ जूलै २०२२ रोजी जाहीर करण्यात आला होता. तेव्हा यावर्षीचा निकाल हा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होऊ शकतो. ९ पॉईंट्स ग्रेडिंग प्रणालीद्वारे हा निकाल जाहीर केला जाईल. ८ मे दरम्यान हा निकाल जाहीर होऊ शकतो. उइडए च्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा डीजीलॉकर नोंदणीद्वारे तुम्ही हा निकाल पाहू शकता. अधिकृत गुणपत्रिका तुम्हाला सर्व परीक्षा संपल्यानंतर बोर्डाकडून देण्यात येईल. या संकेतस्थळावरून विद्यार्थी आपला निकाल पाहू शकतात. यावर्षी सीबीएसई बोर्डातर्फे परीक्षेला बसलेल्या दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांची संख्या ही ३९ लाख इतकी होती. आज दहावीच्या परीक्षा या संपल्या आहेत आणि बारावीच्या परीक्षा २ एप्रिलपर्यंत चालू राहणार आहेत. सीबीएसई बोर्डाच्या परीक्षा १५ फेब्रुवारीपासून सुरू झाल्या होत्या.

## पोलीस पाटील यांच्या मानधनात वाढ

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्य सरकारने लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर पोलीस पाटील यांच्या मानधनात घसघशीत वाढ करून या घटकांना दिलासा दिला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत मानधन वाढीचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार अशा स्वयंसेविकांच्या मानधनात पाच हजार तर पोलीस पाटील यांच्या मानधनात ८ हजार ५०० रुपये वाढ करण्यात आली आहे. राज्यातील आशा स्वयंसेविकांना सध्या राज्य सरकारकडून पाच हजार तर केंद्र सरकारकडून तीन हजार रुपये दरमहा मानधन मिळते. याशिवाय कामाच्या स्वरूपात अन्य मोबदला दिला जातो. या मानधनात वाढ करावी यासाठी आझाद मैदानात आंदोलन केले होते. त्यामुळे त्यांना आता मासिक १३ हजार रुपयांचे मानधन मिळणार आहे. मानधनातील ही वाढ नोव्हेंबर २०२३ या महिन्यापासून देण्यात येईल. २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत वाढीव दराने मानधन देण्यासाठी आवश्यक असलेली २०० कोटी २१ लाख रुपये इतक्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच ९६१ कोटींच्या वार्षिक खर्चास मान्यता देण्यात आली. पोलीस पाटलांच्या मानधनात भरीव वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

# विकसित देशांचा समावेश असणाऱ्या देशांशी भारताचा करार

**नागपूर । वृत्तसेवा**

दहा मार्च रोजी भारत आणि चार युरोपीय देशांचा गट युरोपीय फ्री ट्रेड असोसिएशनने (इएफटीए) गुंतवणूक आणि वस्तू तसेच सेवा क्षेत्रात दोन्ही बाजूंकडील व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी मुक्त व्यापार करारावर (एफटीए) स्वाक्षरी केली आहे. यास व्यापार आणि आर्थिक करार (टीइपीए) असे म्हटले आहे. एफटीएनुसार इएफटीए संघटना पुढील १५ वर्षांसाठी भारतात शंभर अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्यास बांधील आहे. विकसित देशांचा समावेश असणार्या समूहाशी करार करण्याची भारताची पहिलीच वेळ आहे. इएफटीएच्या सदस्य देशांत आइसलँड, स्वित्झर्लंड, नॉर्वे आणि लिंकर्टेस्टाईन यांचा समावेश आहे. करारातील चौदा तरतुदींत वस्तूंचा व्यापार, शोधांचे नियम, संशोधन आणि नावीण्यता, बौद्धिक संपदा अधिकार (आयपीआर), सेवा क्षेत्रातील व्यापार, गुंतवणूक प्रोत्साहन, सहकार्य सरकारी खरेदी, व्यापारातील तांत्रिक अडथळे दूर करणे, व्यापारी सुविधा यांचा समावेश आहे. यामुळे भारतात १० लाख प्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होईल. करारात गुंतवणुकीवर अधिक भर देण्यात आला आहे. चार युरोपीय देशांशी होणार्या भारताच्या एकूण व्यापारात स्वित्झर्लंडचा वाटा ९० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. या कराराच्या माध्यमातून परदेशातील डिजिटल व्यापार, बँकिंग, आर्थिक सेवा, फार्मास्युटिकल्स, टेक्स्टाईल यासारख्या क्षेत्रात भारताला शिरकाव करणे सहज शक्य होणार आहे. कृषी, दुग्धोत्पादन, सोयाबीन, कोळसा सेक्टरला या करारापासून दूर ठेवले. त्याचबरोबर 'पीएलआय' योजनेशी संबंधित असलेल्या सेक्टरसाठीही भारतीय बाजारपेठ खुली केली नाही. ग्रीन आणि विंड एनर्जी, फार्मा, फुड प्रोसेसिंग, केमिकल्ससह उच्च गुणवत्ता असणार्या मशिनरीच्या क्षेत्रात 'इएफटीए' देश भारतात गुंतवणूक करतील आणि त्यामुळे या सेक्टरमधील आपली आयात कमी राहील व उत्पादनाची गुणवत्ता वाढण्यास मदत मिळेल. नव्या करारानुसार स्वित्झर्लंडचा समावेश झाल्याने भारतात लोकप्रिय असणारे स्विस चॉकलेट, घड्याळ आणि बिस्कीट हे वाजवी दरात मिळतील. करारानुसार या वस्तूंवर सध्या आकारले जाणारे आयात शुल्क पुढील सात वर्षांत टप्प्याटप्प्याने बंद केले जाणार आहे. दरवर्षी या शुल्कात कपात होत राहील. त्याचवेळी या करारामुळे इएफटीए देशांच्या विकासासाठी भारताचा मोठा बाजार उपलब्ध झाला आहे. भारतीय कंपन्या पुरवठा साखळीत वैविध्यपणा आणण्याचा प्रयत्न करतील. वास्तविक भारत आणि इएफटीए देश करारासाठी १५ वर्षांपेक्षा अधिक काळांपासून चर्चा करत होते. २०१३ च्या शेवटी चर्चा थांबली होती. २०१६ रोजी चर्चा पुन्हा सुरू झाली आणि हा करार आता प्रत्यक्षात येत आहे. या माध्यमातून भारत आणि इएफटीए देश आर्थिकदृष्ट्या परस्पर पूरक होतील. अर्थात, 'इएफटीए' देश हे युरोपीय संघाचा भाग नाहीत, हे लक्षात घ्या. मुक्त व्यापाराला चालना देण्यासाठी ही एक सरकार अधिनिस्त संघटना आहे. ज्यांना युरोपीय समुदायात सामील व्हायचे नाही, अशा देशांसाठी ही पर्यायी संस्था म्हणून समोर आली. सध्याच्या काळात भारत हा जागतिक पातळीवर नेतृत्व करणारा देश म्हणून नावारूपास येत आहे. अशावेळी अनेक विकसित आणि विकसनशील देश भारतासमवेत मुक्त व्यापार करारासाठी उत्सुक आहेत. भारताची अर्थव्यवस्था वेगाने विकसित आहे. जगात सर्वाधिक तरुण भारतात आहेत आणि सर्वाधिक कौशल्य प्रशिक्षण संस्था, वाढते सेवा क्षेत्र, वाढते निर्यात क्षेत्र आणि बाह्य परिस्थितीने अर्थव्यवस्थेला बसणार्या धक्क्यांना सहन करण्याची विकसित झालेली क्षमता ही नव्या भारताची पायाभरणी आहे. अनिवासी भारतीयांकडून दरवर्षी मायदेशी निधी पाठविण्याचा ओघ वाढला आहे तसेच तंत्रज्ञान विकासालादेखील मदत मिळत आहे. या सर्व गोष्टी भारताला नव्या एफटीएमध्ये संधी निर्माण करण्यासाठी मोलाच्या ठरत आहेत. मुक्त व्यापार करारामुळे भारताला निम्न मध्यम ते उच्च मध्यम गटातील देश होण्यास मदत मिळत आहे. काही दिवसांपूर्वी जागतिक क्रेडिट रेटिंग एजन्सी क्रिसिलने अहवालातील भारत हा आर्थिक, वित्तीय आणि रचनात्मक सुधारणांमुळे २०३१ पर्यंत उच्च मध्यम गटातील देश होऊ शकेल, असे म्हटले आहे. तसेच २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताचा जीडीपी वाढीचा दर ७.६ टक्के आहे आणि तो २०२४-२५ मध्ये ६.८ टक्के राहण्याची शक्यता वर्तविली आहे. भारत ३.६ लाख कोटी डॉलरच्या जीडीपीसह जगातील पाचव्या क्रमाकांची अर्थव्यवस्था आहे. भारतापुढे अमेरिका, चीन, जपान आणि जर्मनी देश आहेत. २०३०-३१ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार ६.७ लाख कोटी डॉलरपर्यंत पोहोचेल अणि त्यावेळी भारतातील प्रतिव्यक्तीचे उत्पन्न वाढून ४,५०० डॉलरपर्यंत पोहोचेल. सध्याची जागतिक मंदी, इस्रायल-पॅलेस्टाईन युद्ध, रशिया-युक्रेन युद्धाच्या काळात भारताने काही गोष्टींचे आकलन केले. निर्यातक्षम होण्यासाठी 'एफटीए'नंतर आता अन्य विविध देशांसाठीही व्यापारी करारासंदर्भात चर्चा वाढवावी लागणार आहे. तसेच देशातील विशेष आर्थिक क्षेत्राची (सेज) नवीन भूमिका, मेक इन इंडिया मोहिमेचे यश आणि उत्पादन आधारित प्रोत्साहन (पीएलआय) योजनेची योग्य मार्गाने अंमलबजावणी करण्यावर लक्ष केंद्रित करत निर्यातीसाठीच्या उपलब्ध संधीचा फायदा उचलायला हवा. भारताला निर्यात वाढविण्याच्या दृष्टीने ऑस्ट्रेलिया आणि संयुक्त अरब अमिरातीशी केलेले व्यापारी करार फायदेशीर ठरत आहेत. त्याचप्रमाणे 'इएफटीए' देशांशी केलेला करारही निर्यात आणि जागतिक बाजार वाढविण्याच्या दृष्टीने मैलाचा दगड सिद्ध होईल. परिणामी, निर्यात वाढेल आणि व्यापक प्रमाणात रोजगारांच्या नवीन संधी उपलब्ध होतील. 'इएफटीए'नंतर भारत आता ओमान, बि-टन, कॅनडा, दक्षिण आफ्रिका, अमेरिका, इस्रायल, गल्फ कंट्रिज कौन्सिल, युरोपीय संघाच्या संभाव्य 'एफटीए'लाही तातडीने अंतिम रूप देईल.

## गांजाची लागवड करणाऱ्यास अटक

नागपूर - गांजाची लागवड करणा-यास सुमारे ९८० किलो गांजासह अटक करण्यात आली आहे. ४४ लाख १० हजार रुपयांची गांजाची



हिरवी ओली झाडे या कारवाईत जप्त करण्यात आली आहे. या कारवाईप्रकरणी चोपडा ग्रामीण पोलिस स्टेशनला अर्जुन सुमाऱ्या पावरा (रा. मेलाणे ता. चोपडा) यास मुद्देमालासह अटक करण्यात आली आहे. शासनाकडून उप जिविकेसाठी मिळालेल्या शेतजमीनीवर अर्जुन पावरा याने गांजाची शेती केली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किसनराव नजनपाटील यांच्या पथकातील स.पो.नि. अमोल मोरे, सफौ युनूस शेख, पोहेकॉ सुनिल दामोदरे, संदिप पाटील, गोरख बागुल, प्रविण मांडोळे, नंदलाल पाटील, दर्शन ढाकणे, पोना अशोक पाटील, पोकॉ बबन पाटील, मपोहेकॉ रजनी माळी, मपोना उपाली खरे आदींनी या कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास स.पो.नि. नितनवरे करत आहेत.

## शिक्षण क्षेत्रावर भर

मुंबई : राज्यात दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. विद्यार्थ्यांसह पालकांनाही टेन्शन आलं आहे. पण आता या मुलांच्या आजी-आजोबांचीही परीक्षा होणार आहे. रविवारी १७ मार्चला ही परीक्षा होणार आहे. महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यात ही परीक्षा होणार आहे. ही परीक्षा कोणती आणि का होणार आहे, असा प्रश्न तुम्हालाही पडला असेल. उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमाअंतर्गत पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी होणार आहे. रविवार १७ मार्च रोजी महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यात ही परीक्षा होणार आहे. राज्यात आतापर्यंत ६ लाख २० हजार इतक्या असाक्षरांची ऑनलाइन नोंदणी केंद्रशासनाकडे झाली असून त्या सर्वांची परीक्षा घेण्याची प्रशासनाने तयारी केली आहे. ५ लाखाहून अधिक नवसाक्षर ही परीक्षा देतील असा अंदाज आहे. उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम सन २०२२ ते सन २०२७ या कालावधीत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

## प्रतिभाताई पाटील यांची प्रकृती स्थिर

नागपूर : माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची प्रकृती अत्यवस्थ असल्याच्या चर्चेत कोणतेही तथ्य नसून त्यांची तब्येत व्यवस्थित आहे. पुण्यातील भारती रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्या उपचारांना चांगला प्रतिसाद देत असून, त्यांना पुढील दोन ते तीन दिवसांत रुग्णालयातून घरी सोडण्यात येईल, अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली. प्रतिभा पाटील यांची तब्येत बरी नसल्याने त्यांना भारती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज गुरुवारी सकाळपासून त्यांची प्रकृती खालावली असल्याची बातमी पसरली. त्यांची प्रकृती गंभीर असल्याची चर्चा सुरू झाली. परंतु, त्या उपचारांना योग्य प्रतिसाद देत असून डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहेत. पुढील दोन दिवसांत त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची अपेक्षा असून त्यानंतर त्यांना घरी सोडण्यात येणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.

## नागपूर जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती



नागपूर : जून ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीत ज्या महसुली मंडळांमध्ये सरासरी पर्जन्याच्या ७५ टक्क्यापेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मिलिमिटरपेक्षा कमी झाले अशा नागपूर जिल्ह्यातील ११ महसुली मंडळांपैकी ५ मंडळात दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर झाली आहे. यात ज्या मंडळाचे विभाजन होऊन नवीन महसूली मंडळ स्थापन करण्यात आलेली आहेत आणि त्या महसूली मंडळात अद्याप पर्जन्यमापक यंत्र बसविण्यात आलेले नाही अशा सावनेर तालुक्यातील चिचोली (खापरखेडा), मौदा तालुक्यातील तारसा, रामटेक तालुक्यातील पवनी व हिवरा बाजार, कळमेश्वर तालुक्यातील गोंडखैरी या महसुली मंडळात दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आली आहे. दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आलेल्या महसुली मंडळात उपाययोजना व सवलतीची तातडीने अंमलबजावणी करण्यात येणार आहे. जमीन महसुलात सुट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू वीज बिलात ३३.५ टक्के सुट. शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामांच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे या सवलती व उपाययोजना करण्यात देणार आहेत.

# बीड जिल्ह्यातील ४६ गावांना डोंगरी विकास निधी

**बीड । प्रतिनिधी**

डोंगरी विकास कार्यक्रम अंतर्गत बीड तालुक्यातील ३९ गावे आणि शिरूर तालुक्यातील ७ गावांना विकास निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे प्रयत्न कामी आले आहेत. त्यांनी सलग एक वर्षांपासून यासाठी पाठपुरावा केला होता. राज्य सरकारने राज्यातील डोंगरी गावांच्या मंजुरीत माजी मंत्री क्षीरसागर यांनी मागणी केलेली गावे समाविष्ट केली आहेत. डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत सुधारित निकष राज्य सरकारने निश्चित केले असून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी गेल्या एक वर्षापासून बीड आणि शिरूर तालुक्यातील गावांचा डोंगरे विकास विभागांतर्गत समाविष्ट व्हावा यासाठी पाठपुरावा केला होता. त्यानुसार बीड तालुक्यातील नवीन ३९ गावे आणि शिरूर कासार तालुक्यातील सात गावांचा समावेश करण्यात आला आहे. या दोन्ही तालुक्यातील गावच्या ग्रामस्थांनी माजी मंत्री जयदत्त



क्षीरसागर यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून गावे डोंगरी विकास अंतर्गत समाविष्ट करावी यासाठी आग्रही मागणी केली होती. त्यानुसार माजी मंत्री क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी ते मंत्रालय पातळीवर सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता. बुधवार दि.१३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अखेर ही मागणी मंजूर करण्यात आली आहे. बीड तालुक्यातील आनंदवाडी, ब्रह्मगाव, रत्नागिरी, शिवनी, पिंपळवाडी, पोखरी, सूर्याचीवाडी, ढेकनमोहा, भंडारवाडी, भाळवणी, पिंपळगाव मोची, सोनपेठ वाडी, कारेगव्हाण, पिंपरनई, तिप्पटवाडी, काठोडा, कदमवाडी, काकडहिरा, मैंदा, मांडवजाळी, मंझरी (ह.), कारळवाडी, वरवटी, बकरवाडी, मांजरसुंबा, आहेर वडगाव, बेलगाव, कुटेवाडी, गवळवाडी, वायभटवाडी, पाली, भवानवाडी, कोळवाडी, निर्मळवाडी, देवरेचीवाडी, मौजवाडी, बोरफडी, करचुंडी, इमामपूर, कासारवाडी या बीड तालुक्यातील ३९ नवीन गावांचा तर शिरूर तालुक्यातील धनगरवाडी, मलकाची वाडी, वंजारवाडी, बारगजवाडी, येवलवाडी, बरगवाडी, हटकरवाडी या ७ नवीन गावांचा समावेश करण्यात आला आहे. डोंगरी विकास विभागांतर्गत या समाविष्ट झालेल्या गावांना आता शासनाच्या विविध सुविधा आणि योजनांचा लाभ घेता येणार आहे. या ठिकाणी असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देखील मिळणार आहेत तर बेरोजगारांना नोकर्या देखील उपलब्ध होणार आहे. शासनाचा विविध विकास कामांचा निधी स्वतंत्रपणे डोंगरी विकास अंतर्गत दिला जात असतो तो निधी आता प्राधान्याने मिळणार आहे. डोंगरी भागात समावेश करण्यात आलेल्या गावांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी शासनाकडून येणार्या काळामध्ये विविध योजनेच्या माध्यमातून अतिरिक्त निधीचा पुरवठा करण्यात येणार आहे त्यामुळे इतर गावाच्या तुलनेत डोंगर प्रवण क्षेत्राचा विकास अधिक प्रमाणात होणार आहे. त्यामुळे बीड तालुक्यातील ३९ आणि शिरूर तालुक्यातील ७ गावांना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. बीड मतदार संघातील ही गावे समाविष्ट झाल्याने अनेक गावच्या सरपंच आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी माजी मंत्री क्षीरसागर यांचे प्रयत्न कामी आल्यामुळे समाधान व्यक्त केले आहे.

## आयोगाच्या महत्वाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करून अधिकाऱ्याचा बचाव

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भातील अनियमिततेमध्ये निवडणूक आयोगाच्या महत्वाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करून अधिकाऱ्यांचा बचाव करण्यात आल्याचे स्पष्ट आहे.तरीही अधिकारी मात्र आपण बदलीपात्र कसे नाहीत हे दाखविण्यात धन्यता मानीत असल्याचे या संदर्भाने निवडणूक आयोगाकडे तक्रार केलेले तक्रारकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

बीड जिल्ह्यात पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करताना अनियमितता झाल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. यासंदर्भाने माहिती देताना डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे की , निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीच्या संदर्भाने बदल्याकरण्यासाठी वेगवेगळे निर्देश दिले होते.त्यात गृह विभागाने काही मुद्द्यांबाबत अधिकचे मार्गदर्शन मागविल्यानंतर २७ फेब्रुवारी २०२४ रोजी निवडणूक आयोगाचे शेवटचे स्पष्टीकरण राज्यातील सर्व विभागांना पाठविण्यात आले. यात निवडणुकीच्या संदर्भाने बदल्या करण्यासाठी बदलीपात्र अधिकाऱ्यांचे संवर्ग स्पष्ट केले. यात गृह विभागातील पोलीस महासंचालकांपासून ते सर्कल ऑफिसर किंवा तत्सम (म्हणजे महाराष्ट्राच्या संदर्भाने पोलीस निरीक्षक ) असे संवर्ग निश्चित केले आहेत. यात या संवर्गातील कोणीही एखाद्या जिल्ह्यात मागच्या ४ पैकी ३ वर्ष सेवा केली असेल तर त्याची जिल्ह्याबाहेर बदली करावी असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.यात कार्यकारी, अकार्यकारी असा कोणताही उल्लेख २७ फेब्रुवारीच्या पत्रात निवडणूक आयोगाने केलेला नाही. तरीही बीड जिल्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या प्रमुख अधिकाऱ्याला वाचविण्यात आले. जर शाखेच्या प्रमुखाला बदलायचे नसेल तर आयोगाच्या पत्रातील 'स्वजिल्हा' हा निकष देखील या शाखेतील कोणालाच लागू होण्याचे कारण नव्हते, मात्र याच शाखेतील पोलीस उपनिरीक्षकाची स्वजिल्ह्याचे कारण दाखवत बदली करण्यात आली आणि पोलीस निरीक्षकाला मात्र एलसीबीला नियम लागू नाहीत म्हणून संरक्षण देण्यात येते हा प्रकार दुटप्पी असल्याचे डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे.

त्यासोबतच ४ मार्चच्या आदेशाचा हवाला काही लोक देत आहेत, मात्र त्यात केवळ गृह विभागाने केलेल्या काही बदल्या रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यात कोणालाही संरक्षण देण्याचा कसलाच उल्लेख नाही असेही डॉ. गणेश ढवळे यांनी स्पष्ट केले असून आपण या विषयात पाठपुरावा सोडणार नसल्याचे म्हटले आहे.

## पुरस्काराने जनसेवा बहुउद्देशीय सामाजिक संस्था सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील जनसेवा बहुउद्देशीय सामाजिक संस्था ही महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सन२०२२-२३ साठी उत्कृष्ट सामाजिक कार्य केल्याबद्दल राज्यस्तरीय विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नुकतेच या संस्थेस एका राज्यस्तरीय कार्यक्रमामध्ये नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स नाट्यगृह एनसीपीए मार्ग नरिमन पॉईंट मुंबई येथे मंगळवार दि. १२ मार्च २०२४ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सामाजिक न्याय विभागाचे मुख्य सचिव सुमंत भांगे, ओमप्रकाश बकोरिया , समाज कल्याण आयुक्त पुणे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते . तर हा पुरस्कार स्वीकारताना जनसेवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक आपल्या कुटुंबियांसह उपस्थित होते.

# महिलांना विविध योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरू -अमृत सारडा

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातच नव्हे तर जिल्हाभरात आपल्या सामाजिक कार्यातून एक आगळी वेगळी ओळख निर्माण करणारे पेठ बीड शहर विकास कृती समितीचे अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष अमृत काका सारडा यांनी महिला दिनानिमित्त बीड शहरातील तसेच पेठ बीड भागातील असंघटित व घरेलू महिला कामगार यांना एक अनोखी भेट दिली. हजारो महिलांच्या उपस्थितीत महिलांना नोंदणी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. अमृत काका सारडा यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक केले जात आहे. महिलांची संघटशक्ती बरोबरच त्यांचा स्वाभिमान जागृत करण्याचे काम केले आहे. समाजात कार्यकर्त्यांना पदापेक्षा मनाचा मोठेपणा आवश्यक असतो आणि तो अमृत काका सारडा यांच्याकडे पाहिल्यानंतर ठळकपणे दिसून येत असल्याचे महिला आयोगाच्या सदस्या संगीता चव्हाण यांनी सांगितले. तर अमृत काका सारडा हे पेठ बीडचे वैभव असून विविध छोट्या छोट्या जाती समूहांना एकत्र जोडून समाजकार्यात त्यांना बांधून ठेवण्याचे कार्य मागील अनेक काळापासून करीत असून रणजीत भाऊ चव्हाण हे पेठ बीडचे वैभव होते तर अमृत काका सारडा हे कार्यसम्राट समाजसेवक आहेत. काकांनी समाजकार्याबरोबरच नगराध्यक्ष पदासारखे संविधान संविधानिक पदासाठी प्रयत्न करावा आम्ही व्यासपीठावरील विविध पक्षाचे प्रमुख त्यांच्या विजयासाठी प्रयत्न करून असे प्रतिपादन ॅड. शेख शफीक भाऊ यांनी प्रतिपादन केले. बुधवारी पेठ बीड शहर विकास कृती समितीच्या वतीने शहरातील असंघटित महिला घरेलू कामगाराच्या मंजुरी प्रमाणपत्राचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर महिला आयोगाच्या सदस्या संगीता चव्हाण, ॅड. शेख शफिक भाऊ, उद्योजक बाबुशेट लोढा, उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, नगरसेवक विष्णू वाघमारे, माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर जगताप, आरपीआयचे राजू




जोगदंद, सी .ए .बी. बी. जाधव साहेब, गोरख शिंगण, नगरसेवक सम्राटसिंह चव्हाण, संजय महाव्दार, दिनेश मुंदडा, राणा चौव्हाण, नगरसेवक मुन्ना इनामदार, अमोल पौळ, लक्ष्मण शेणकुडे, दत्तात्रय नलावडे, सभापती इलियास भाई, हनुमान पांडे , संगीता वाघमारे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. पुढे बोलताना ॅड. चव्हाण म्हणाल्या की पेठ बीड शहर कृती विकास समिती बीडच्या माध्यमातून बीड शहर व परिसरात मोफत पाणीपुरवठा, कोरोना महामारीच्या काळात मोफत अन्नछत्र, मोफत ॅक्शीजन कॅनचे वाटप, पेठ बीड भागातील मध्यवर्ती असलेल्या यशवंत उद्यानाचे सुशोभीकरण,शहराचे ग्रामदैवत असलेल्या कंकालेश्वर मंदिराच्या गाळ काढण्यासाठी पुढाकार घेणे यासह विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक उपक्रमात सहभाग घेतला असून भाऊ म्हणून अमृत काकांनी घरेलू महिला कामगारांना आधार देण्याचे काम केले आहे. पुढे बोलताना ॅड.शफीकभाऊ म्हणाले की पेठ बीड भागात अनेक जाती धर्माचे लोक मोठ्या आनंदात राहतात. या जाती समुहाच्या सुखादु:खात सहभागी होवून त्यांना जोडण्याची कला अमृत काका सारडा यांच्याकडे नक्कीच आहे असे ते म्हणाले. आरपीआयचे राजु जोगदंड यावेळी म्हणाले की समाजातील प्रत्येक घटकांना अमृतकाका म्हणजे आपला माणूस वाटतो. पेठ बीड भागातील सण,उत्सव, महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथी असो की अन्नदानात अमृत काकाचा सहभाग असतोच हे समीकरण मागील अनेक वर्षांपासून सुरू असून पेठ बीड भागातील अमृत काका सारडा यांचे गोरं गरीबांसाठी मदतीचा पुढेच असतात असे ते म्हणाले. यावेळी प्रास्ताविक करताना माजी उपनगराध्यक्ष तथा पेठ बीड शहर विकास कृती समितीचे अध्यक्ष अमृत काका सारडा हणाले की सामाजिक कार्यात महत्वपूर्ण योगदान असणाऱ्या पेठ बीड समितीच्या वतीने घरेलू महिलांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी तत्कालीन कामगारमंत्री ना.हसन मुश्रीफ यांच्याकडे तर सध्याचे कामगार मंत्री ना.सुरेश खाडे, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, सर्व सन्माननीय आमदार, खासदार महोदय, ना.पंकजाताई मुंडे, ना.जयदत्त आण्णा क्षीरसागर आदींसह वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी यांच्याकडे सदरील महिलांच्या प्रश्नावर पाठपुरावा केला. बीड शहरातील असंघटीत (घरातील धुणे भांडी, भाजी पोळी, साफसफाई, खाजगी दवाखान्यात काम करणाऱ्या महिला) यांना व त्यांच्या कुटुंबीयांना भेडसावणाऱ्या सामाजिक, अर्थिक अडचणींवर मार्ग काढण्यासाठी बीड जिल्हा कामगार कार्यालयाच्या सहकार्याने असंघटीत घरेलू महिला कामगाराची मोफत नोंदणी करण्यात येत असून जवळपास ९५० असंघटीत घरेलू महिला कामगारांची पेठ बीड समितीच्या वतीने प्रामुख्याने दखल घेत नोंद करण्यात आली तर जिल्हा कामगार कार्यालयाच्या (महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ,बीड ) वतीने जवळपास ५५० घरेलू कामगार महिलांची समितीच्या वतीने या महिला कामगारांची नोंदणी महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाकडे कामगारांची नोंदणी करण्यासाठी पुरेसे कर्मचारी संख्याबळ नसल्यामुळे नोंदणी कामी विलंब होत आहे . यातून मार्ग काढण्यासाठी व असंघटीत घरेलू कामगाराना उपयुक्त असणाऱ्या भांड्याच्या किटसाठी मोठ्या प्रमाणात सहभाग घेण्यासाठी राज्य शासनाने काढलेल्या परिपत्रकात सुधारणा करून त्यात दि.३१ मार्च २०२४ पर्यत वाढ करावी. या असंघटीत घरेलू महिला भेडसावणाऱ्या अर्थिक समस्या शासनस्तरावर मार्गी लावण्यासाठी या असंघटीत घरेलू महिला कामगारांना १५००/- मानधन, वय वर्षे ६० झालेल्या महिलांना पेन्शन, विमा कवच मिळणेसाठी समितीच्या वतीने शासन दरबारी पाठपुरावा करीत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश साळुंके यांनी केले. तर यावेळी जयंत राऊत, दादा हतागळे, लक्ष्मण शेणकुडे, शाम भागवत, संजय घेणे, वीजय पिव्हाळ, सुरेश जगताप, गौतम कांबळे, सतपाल लाहोट, ईश्वर पवार, रंजीत शिनगारे, गुरूप्रसाद पांडे, विजय जोगदंड, सखाराम चांदणे, भागचंद परदेशी, राम ईगडे , नितीन साखरे, नितीन ईगडे, राम कदम, भागवत बादाडे, शेख हाफीस, सोमनाथ टवूळ, सचिन संचेती, भरत चुंगडे, प्रभाकर शिंदे, अनिल मुसळे, दायमाजी यासह पेठ बीड भागातील महिला, पुरुष नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. याप्रसंगी औपचारिक पाच महिलांना मान्यवरांच्या हस्ते मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले. घरेलू महिला कामगारांनी अमृतकाका सारडा यांचा सत्कार केला.

## महिलांचे ठिय्या आंदोलन



गेवराई - गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे मागील २५ ते ३० वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील जागेचा पीटीआर मिळावा, या प्रमुख मागणीसाठी मंगळवारपासून युवकांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. आज (दि.१४) तलवाडा गावात कडकडीत बंद पाळण्यात आला. तर छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुरू असलेल्या उपोषणस्थळी महिलांनी दिवसभर ठिय्या आंदोलन केले. माजी मंत्री बदामराव पंडित, बीड जि.प.चे माजी अध्यक्ष - विजयसिंह पंडित, महेश अण्णा दाभाडे, गटविकास अधिकारी गेवराई, पोलिस अधिकारी व कर्मचारी, सा.बां.विभागाचे अधिकारी यांनी उपोषणस्थळी भेट देऊन चर्चा केली. तीन दिवसांपासून आमरण उपोषणाला बसलेल्या युवकांची प्रकृती खालावली असून उपचारासाठी आलेले आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी - कर्मचारी यांच्याकडून उपचार घेण्यास आंदोलनकर्त्यांनी नकार दिला आहे. तलवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे भव्यदिव्य असे बांधकाम करण्यात आलेले असून या चौकाची तलवाडा ग्रामपंचायतला मात्र नोंद नाही. या चौकाची नोंद करून पीटीआर मिळावा, यासाठी रोषण हात्ते, अनिकेत नाटकर, शुभम जैत, दादाराव रोकडे यांच्यासह ८ जण तीन दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले आहेत. जोपर्यंत पीटीआर मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा पवित्रा उपोषणकर्ते युवक व गावातील महिलांनी घेतला आहे.

## भगवान सेना मुंडे परीवाराच्या पाठीशी - सानप

बीड - ऐश्वर्यसंपन्न संतश्रेष्ठ श्री भगवान बाबा यांचे बीड शहरातील प्रतिष्ठाण आणि परिसराचा



विकास करणे यासाठी तब्बल एक कोटी रुपये तसेच बीड शहरातील ऐतिहासिक व धार्मिक धरोहर असलेल्या हजरत मन्सूर शहावली दर्ग्याच्या विकासासाठी एक कोटी रुपये निधी मंजूर करून दिल्याबद्दल बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री धनंजय मुंडे यांचे जाहीर आभार व्यक्त करणारे पत्रक भगवान सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा पूर्णवादी नागरी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष चंद्रकांत सानप यांनी प्रसिद्धिस दिले आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री धनंजय मुंडे यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या माध्यमातून प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून बीड जिल्ह्यासाठी सुमारे २५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला असून या अंतर्गत बीड शहरातील संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या विकासासाठी एक कोटी रुपये तसेच बीड शहरातील हजरत मन्सूर शहावली दर्ग्याच्या विकासासाठी एक कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून संबंधित धार्मिक स्थळांचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यात येणार असून यासाठी भगवान सेनेचे संस्थापक तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत सानप यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे जाहीर आभार प्रसिद्धिपत्रकाद्वारे व्यक्त केले आहेत, तसेच भगवान सेना मुंडे परिवाराच्या पाठीशी असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

## डॉ.आंबेडकर जयंती उत्सव समिती

बीड - भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १३३ वी जयंती विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून दरवर्षी सालाबादा प्रमाणे या ही वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी करण्यासाठी एकता नगर पेठ बीड येथील सर्व पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते महिला व नागरिकांच्या उपस्थितीत दी.१२ मार्च २०२४ मंगळवार रोजी. सायंकाळी ठीक ८ .वा बैठक संपन्न होऊन पुढील कार्यकारणी घोषित करण्यात आली अध्यक्षपदी जितू धनवे तर सचिव पदी नागसेन वीर यांची निवड करण्यात आली.

asianpaints

रूद्र कलर होम

आमच्याकडे सर्व प्रकारचे वॉटर कलर, सिमेंट कलर मिळतील.

प्रो.प्रा. वाघीरे
9146702323
8149800020

पत्ता : राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड, बीड

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com